**प्रेस नोट - ४४** **दिनांक २१/१०/२०२३**

## <u>नेहरूनगर पोलीस ठाणे कडून जबरीने सोन साखळी चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करून तीन गुन्हे उघडकीस आणले बाबत.</u>

दिनांक ०६/१०/२०२३ रोजी नेहरूनगर पोलीस ठाणे हद्दीत मोटार स्कुटरवरील दोन अनोळखी इसमांनी एका महिलेच्या गळयातील २० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन खेचुन पळुन गेलेबाबत माहिती मिळाल्याने सदर प्रकरणी नेहरूनगर पोलीस ठाणे येथे कलम ३९२, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास स.पो.नि. भुषण मोरे हे करीत होते.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-६, मुंबई तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेहरूनगर पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करत असताना सदर गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपीत इसम सदरचा गुन्हा करून ठाणे, नवीमुंबई या ठिकाणी स्कुटर वरून निघुन गेल्याचे दिसून असले परंतु त्यांनी गुन्हा करताना वापरण्यात आलेल्या स्कुटरचा क्रमांक मिळुन आला नाही.

दिनांक १७/१०/२०२३ रोजी सायंकाळी पंतनगर पोलीस ठाणे हद्दीत तशाच प्रकारची स्कुटरवरील अज्ञात इसमांनी चैन स्नॅचिंग केल्याबाबतची माहिती प्राप्त होताच नेहरूनगर पोलीस ठाण्याचे व.पो.नि. श्री. युसूफ सौदागर यांनी मा. पोलीस उप आयुक्त, श्री हेमराजसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथके तयार केली. तपास पथकाने नमुद गुन्हयाचा तांत्रिक तपास करून गुन्हयातील आरोपी इसम मोहम्मद अफझल कुरेशी, वय ४३ वर्षे व त्यांचा मुलगा (विधीसंर्घषग्रस्त बालक) यांना पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक तपास केला असता, त्यांनी मुंबई शहरामध्ये एकुण ०३ ठिकाणी सोनसाखळी चोरी केल्याबाबतची माहिती दिली. आरोपी नामे मोहम्मद अफजल कुरेशी याच्याकडे अधिक तपास करून त्यांच्याकडुन तीन गुन्हयातील अंदोज ६० ग्रॅम वजनाचे सोने हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. विनायक देशमुख, मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-६, श्री. हेमराजसिंह राजपूत, सहाय्यक पोलीस आयुक्त, नेहरूनगर विभाग, श्री. शशिकांत भंडारे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेहरूनगर पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली स.पो.नि. भूषण मोरे व पथक यांनी केलेली आहे.

..................